पुढारी




बोरपाडळे : येथे मार्गदर्शन करताना डॉ. आरती गोखले.

# मृत्यूपश्चात जिवंत राहायचे असेल, तर अवयव दान करा : डॉ. गोखले

**बोरपाडळे : पुढारी वृत्तसेवा**

अवयवय दान करणे हे एक दयाळू कृत्य आहे जे तुम्ही नसताना तुम्हाला जिवंत ठेवते. मृत्यूपश्चात जिवंत राहायचे असेल तर अवयव दान करा, असे प्रतिपादन डॉ. आरती गोखले यांनी केले. बोरपाडळे (ता. पन्हाळा) डॉ. दीपक पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज आयोजित कार्यक्रमानिमित्त त्या बोलत होत्या.

जगभर अवयव दानाचे महत्त्व वाढले आहे. मृत्यूनंतर शरीरातील किडनी, हृदय, यकृत, डोळे, फुफ्फुसे, स्वादुपिंड व त्वचा असे दहा अवयव दान करू शकतो. या दान अवयवाचे डॉक्टरांनी गरजू रुग्णांवर प्रत्यारोपण केल्याने त्यांना जीवदान मिळते. त्यामुळे मरणाच्या अवस्थेत असलेली माणसे पुन्हा चांगले आयुष्य जगू शकतात. हे मोठे सामाजिक कार्य म्हणावे लागेल.

संजीवनी मल्टिपर्पज फाऊंडेशन व डॉ. दीपक पाटील वैद्यकीय शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ. दीपक पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त हे व्याख्यान आयोजित केले होते.वाढदिवसानिमित्त शुभेच्छा स्वरूपात संकलन केलेल्या वह्या परिसरातील विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आल्या.वृक्षारोपण, रक्तदान आरोग्य शिबिर असे विविध उपक्रम राबविण्यात आले.

यावेळी सचिन पाटील, डॉ.स्वाती पाटील, स्मिता पाटील, सरपंच अमर दाभाडे, वसंत थोरात, संजय लबडे, सचिन पाटील, भारत पाटील, डॉ. अभिजित शिराळकर, डॉ. बाबासो पाटील उपस्थित होते.

My Kolhapur Edition
Jul 30, 2022 Page No. 11
newspaper.pudhari.co.in